नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १३५ Issue - 135 | वार मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ Blow- Tuesday Date 1 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात

### सर्वोच्च न्यायालयामुळे दलित मुलाचा आयआयटी मध्ये प्रवेश

दिल्ली : दिलेल्या मुदतीत शुल्क न भरू शकल्यामुळे एका दलित विद्यार्थ्याला आयआयटी धनबादमध्ये प्रवेश घेता आला नव्हता. मात्र, या प्रकरणावरून आयआयटी प्रशासनावर नाराजी व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने आज (३० सप्टेंबर) एक महत्त्वाचा निकाल दिला. याप्रकरणी सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने आयआयटी धनबदाला निर्देश दिले आहेत की त्यांनी त्या दलित विद्यार्थ्याला आयआयटीत प्रवेश द्यावा. घरच्या हालाकीच्या परिस्थितीमुळे हा तरुण आयआयटीचं शुल्क भरू शकला नव्हता. त्यानंतर या विद्यार्थ्याने थेट सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं होतं. उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगर जिल्ह्यात राहणाऱ्या एका मजुराचा मुलगा अतुल कुमार (१८) मोठ्या कष्टाने जेईई परीक्षा उत्तीर्ण झाला होता. त्याला आयआयटी धनबादमध्ये इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंग विभागातील सीट मिळाली होती. २४ जून २०२४ पर्यंत त्याला शुल्क भरावं लागणार होतं. मात्र तो वेळेत पैशांची जमवाजमव करून शुल्क भरू शकला नव्हता. त्यामुळे त्याची सीट रद्द केली गेली. त्यानंतर अतुलने झारखंड उच्च न्यायालय व मद्रास उच्च न्यायालयाचं दार ठोठावलं. तिथे त्याला न्याय मिळाला नाही. अखेर अतुलने सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं. सोमवारी याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने आयआयटीवर नाराजी व्यक्त केली. तसेच न्यायमूर्ती म्हणाले, आपण अशी प्रतिभा गमावू शकत नाही. आपण या तरुण मुलांमधील प्रतिभेला प्रोत्साहन द्यायला हवं.

# निर्णयांचा धडाका; अनुकंपा धोरणासह मंत्रिमंडळाने घेतले ३८ निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. एकीकडे विरोधक राज्यातील विविध विषयांवरून सरकारवर टीकेची झोड उठवत आहेत, तर दुसरीकडे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निर्णयाचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (३० सप्टेंबर) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मंत्रिमंडळाची बैठक महत्त्वपूर्ण मानली जात होती. या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकार कोणते निर्णय घेणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध विषयांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा लाभ सुमारे ४० हजार होमगार्ड यांना होणार आहे, तसेच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार, ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. तसेच माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारने स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने कोणते मोठे निर्णय घेतले?




कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, अनुकंपा धोरणही लागू करण्यात येणार (महसूल विभाग) ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय (नियोजन विभाग) ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार. एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता (नगर विकास विभाग)

ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार, १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता (नगर विकास विभाग) ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार (नगर विकास विभाग) देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना. (पशुसंवर्धन विभाग) भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार (क्रीडा विभाग) रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा (महसूल विभाग) राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार, जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार (जलसंपदा विभाग) जळगाव जिल्ह्यातील भागपूर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता. ३० हजार हेक्टर जमीन सिंचित होणार (जलसंपदा विभाग) लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता (जलसंपदा विभाग) धुळ्याच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन (महसूल विभाग) रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार. एमएमआरडीए ला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत (नगर विकास विभाग) केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार, दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार (गृहनिर्माण विभाग) पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक (बंदरे विभाग) धारावीतील अपात्र (पान २ वर..)

## इंदापूर येथे तीस वर्षीय युवकावर झाडल्या चार गोळ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : तीस वर्षीय युवकावर इंदापूर महाविद्यालयासमोर अज्ञात इसमाने आज दिनांक ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास गावठी पिस्तुलाच्या सहाय्याने चार गोळ्या झाडल्या असल्याची घटना घडली.







राहूल अशोक चव्हाण (वय ३० वर्षे राहणार शिरसोडी ता.इंदापूर जि. पुणे) असे जखमी युवकाचे नाव आहे.

सविस्तर वृत्त असे, की इंदापूर शहरात राहूल अशोक चव्हाण पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र चालवित आहेत. आज सोमवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास इंदापूर महाविद्यालयासमोर असताना, अज्ञात इसमाने पाठीमागून येऊन गावठी पिस्तुलाच्या सहाय्याने चार गोळ्या झाडल्या. घटनेनंतर अज्ञात इसम फरार झाला.

राहुल अशोक चव्हाण हा इंदापूर महाविद्यालयातील पटांगणावर नेहमीप्रमाणे पोलीस भरती प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांकडून सराव करून घेऊन, महाविद्यालयाच्या बाहेर येऊन थांबला असताना ही घटना घडली. जखमी राहूल अशोक चव्हाण याला पुढील औषधोचरासाठी डॉ. अविनाश पाणबुडे यांच्या रुग्णालयात दाखला करण्यात आले आहे .

राहूल अशोक चव्हाण यांच्या पाठीमध्ये चार गोळ्या झाडल्या आहेत. एक जखम चार इंच खोल (पान २ वर...)

## 'लाडकी बहीण'मुळे अन्य अनुदानांवर परिणाम! नितीन गडकरी यांचे परखड मत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्यामुळे इतर क्षेत्रांमध्ये वेळेवर अनुदान दिले जाईल याची खात्री नाही असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले आहे. ते रविवारी नागपूरमध्ये एका कार्यक्रमात बोलत होते.

गडकरींच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या आर्थिक स्थितीबद्दल पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राज्य सरकारने वार्षिक कौटुंबिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबांमधील १८ ते ६५ या वयोगटातील स्त्रियांसाठी ही योजना अलिकडेच सुरू केली आहे. त्याअंतर्गत दरमहा १,५०० रुपये दिले जातात. यामुळे तिजोरीतून वर्षाला जवळपास ४६ हजार कोटी खर्च होणार आहेत. योजनेच्या लाभार्थींची संख्या सुमारे अडीच कोटी आहे. याबाबत गडकरींनी गुंतवणुकीसाठी पूर्णपणे सरकारवर अवलंबून राहू नये असे आवाहन जनतेला केले. गुंतवणूकदारांना त्यांचा अनुदानाचे पैसे वेळेवर मिळतील का याची अजिबात खात्री नाही. कारण सध्या सरकारला लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी द्यावा लागत आहे.

## 'हे कोर्टरुम आहे, कॉफी शॉप नाही'; सरन्यायाधीश संतापले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सोमवारी नवी दिल्लीत भारताचे सरन्यायाधीश (उगख) डी वाय चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान एका वकिलाला फटकारले. याचिका माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या विरोधात चौकशीची मागणीची होती. कोर्टात याच सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्याशी बोलताना वकिलाने 'या या' असे म्हणत एका प्रश्नाला उत्तर दिले. सरन्यायाधीशांनी हेच उत्तर अधोरेखित केले आणि खडसावले की हे कोर्टरूम आहे कॉफी शॉप नाही. असे



'या, या, या' म्हणू नका. 'हो' म्हणा हे कॉफी शॉप नाही, हे कोर्ट आहे. मला लोक 'या, या' म्हणणारे आवडत नाहीत, असे स्पष्टपणे चिडलेल्या सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी मत मांडले. सर्वोच्च न्यायालय २०१८ मध्ये दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत होते. ज्यामध्ये माजी उगख रंजन गोगोई यांच्या विरोधात अंतर्गत चौकशीची मागणी करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी विचारले, पण ही कलम ३२ अंतर्गत याचिका आहे का? न्यायाधीशाला प्रतिवादी बनवून तुम्ही जनहित याचिका कशी दाखल करू शकता? प्रत्युत्तरात, याचिकाकर्त्याने म्हटले, या-या... माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई... मला उपचारात्मक याचिका दाखल करण्यास सांगण्यात आले आहे... याच प्रश्नाला उत्तर देताना याचिकाकर्ते यांनी या या शब्दांचा वापर केला होता.

## भारत निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या विधानसभा निवडणूक नियोजनाचे कौतुक


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्यात विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाचा महाराष्ट्र दौरा झाला. मुंबई येथे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या व आचारसंहिता लागल्यानंतर करावयाच्या तयारीचा आढावा निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी घेतला. यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी

**मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी राज्यातील इतर जिल्हाधिकाऱ्यांनी सोलापूर प्रमाणे नियोजन करण्याचे आवाहन**

कुमार आशीर्वाद यांनी महिला मतदान नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा वापर यासाठी केलेल्या तयारी व नियोजनाची दखल घेऊन राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातही सोलापूर प्रमाणे नियोजन करावे असे सुचित केले.

सोलापूरचे जिल्हाधिकारी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजात स्वतः लक्ष घालून मतदानाची टक्केवारी वाढवणे व सर्व मतदान प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अत्यंत कुशलतेने सामाजिक जाणीव ठेवून पूर्वतयारी व नियोजन करत असल्याबद्दल मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी कौतुक केले.



**महिला मतदान नोंदणी:-** जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ज्या गावात (पान २ वर...)

**विविध खटल्यांमध्ये ८१ कोटी ५ लाख ८१ हजार ३६० रुपयांची तडजोड** — **अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी दिली माहिती**

# लोक अदालतीमध्ये तडजोडीअंती १० हजार ९९० प्रकरणे निकाली


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : बैंकेचे थकीत कर्ज कस भरायचं.. घरातील वाद कधी मिटवायचं. यासह अनेक समस्यांनी ग्रासलेल्या लोकांना शनिवार दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यात भरलेल्या लोकअदालतीमुळे दिलासा मिळावा. काहींच्या कौटुंबिक वादावर पडदा पडून पती पत्नी एकत्रीत आले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे शनिवारी घेण्यात आलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकारणातर्फे शहर व जिल्ह्यातील राष्ट्रीय लोकअदालतीअंतर्गत १० हजार ९९० प्ररणे सामंजस्याने निकाली काढयात आली आहेत. दरम्यान, विविध खटल्यांमध्ये ८१ कोटी ५ लाख ८१ हजार ३६० रुपयांची तडजोड करण्यात आली.

लोकअदालतीचे उद्घाटन मा. अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगती जिल्हा न्यायाधीश पी.एस. खुणे, महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य ॲड मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकिल ॲड प्रदीपसिंह राजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अमित आळंगे, जिल्हा न्यायालयाचे प्र.प्रबंधक एम.के.ढोबळे आदी उपस्थित होते. जिल्हा न्यायालयासह सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये दिवसभर लोकअदालत घेण्यात आली.

लोकअदालतीमध्ये ३९ हजार ११० प्रलंबित प्रकरणे, ५१ हजार ४३५ दाखलपुर्व प्रकरणे असे एकुण



९० हजार ५४५ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ६०७ प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली. ६ हजार ३८३ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकुण तडजोडीने निकाली काढण्यात आली.

सदर लोकअदालतीच्या पॅनलवर पी.एस.खुणे, एस.व्ही.केंद्रे, श्रीमती एस.एन.रतकंठवार, श्रीमती. एन.के. कोठुळे, श्रीमती. डी.डी.कोळपकर, पी.बी.वराडे, श्रीमती ए.एस.बिराजदार, डी.जी.कंखरे, पी.पी.पेठकर, एस.आर.सातभाई, श्रीमती आर के.जंगम, श्रीमती. पी.व्ही. चव्हाण या न्यायाधीशांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील विधिज्ञ स्नेहल राऊत, एस.एम. झुरळे, एम.बी.सोनलकर, रेवण पाटील, जी.बी.नवले तसेच विधीज्ञ एन.के.वाडेकर, आर.आर. बिराजदार, एस.एस.मोरडे, वि.वि. कुरले, आदींनी काम केले पाहिजे.

सदर लोकअदालत यशस्वी करण्या करीता जिल्हा विधीसेवा प्राधिकारणाचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.मो.सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकारणाचे सचिन श्री. उमेश देवर्षी तसेच पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस अधिक्षक अतुल कलकर्णी, महापालिका आयुक्त श्रीमती. शीतल तेली, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, डीसीपी श्रीविजय कबाडे यांचे सहकार्य लाभले तसेच जिल्हा न्यायालय सोलापूर व विधी सेवा प्राधिकरण येथील कर्मचारी, लोक अभिरक्षक कार्यालयातील विधीज्ञ व कर्मचारी यांना लोकअदालत यशस्वी करण्याकरीता परीश्रम घेतले.

स्पेशल ड्राईव्ह:- लोकन्यायालयाच्या अगोदर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५ दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथम न्याय दंडाधिकारी न्यायालयात घेण्यात आला. सोलापूर जिल्ह्यामध्ये सदर ५ दिवसांमध्ये ३ हजार ३८० प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यापैकी पाच वर्षे जुनी ५६३ खटले, १० वर्षे जुनी ६३ खटले, १५ वर्षे जुनी ६ खटले, २० वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेल्या एक खटला, तीस वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असल्याने दोन खटले, चाळीस वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असलेला एक खटला निकाली काढण्या आला.

**सदर लोक अदालतीमध्ये दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर येथील सर्व ग्राम पंचायतीचे कर वसूलीचे दाखल पूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ईशाधीन शेळकंदे, उत्तर सोलापूरचे गट विकास अधिकारी श्रीमती जस्मिन शेख, दक्षिण सोलापूरचे गट विकास अधिकारी व सर्व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांच्या सहकार्याने ८३८ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली असून १ कोटी १९ लाख ८४ हजार २५१ इतकी रक्कम सदर लोकअदालतीमध्ये वसूल झाली आहेत.**

महानगरपालीका:- सोलापूर शहरातील मिळतीचे थकीत कर व गाळा भाडे वसुलीकरीता दाखपुर्व प्रकरणे महानगरपालीका सोलापूर यांच्या वतीने लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आलेली होती. सदर लोकअदालतीमध्ये आयुक्त शीतल तेली-उगले, सहायक आयुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, व करआकारणी प्रमुख युवराज गाडेकर करसंकलन विभागातील सर्व कर्मचारी यांचे मालमत्ता (पान २ वर...)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ 

## संपादकीय....

### संघर्ष चिघळला

पेजर हल्ले, दोन आठवडे हवाई हल्ले आणि गेल्या आठवड्यात हेझबोला प्रमुख हसन नसराल्लाह याच्या हत्येनंतर इस्रायलने जमिनीवरु आक्रमण केले आहे. लेबनीज सरकारच्या म्हणण्यानुसार, हवाई हल्ल्यांमुळे सुमारे एक हजार नागरिक मारले गेले आणि दहा लाख लोकांना त्यांची घरे सोडून पळून गेली. तसंच, अनेक हेजबोला कमांडर्स ठारे झाले आहेत. लेबनॉनच्या दक्षिणेकडील प्रदेश, पूर्व बेका व्हॅली आणि बेरूतवर इस्त्रायली हल्ल्यात गेल्या २४ तासांत किमान ९५ लोक मारले गेले आणि १७२ जखमी झाले. इस्रायल आणि लेबनॉन यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस वाढत जात आहे. हेझबोलाचा प्रमुख हसन नसरल्लाहला ठार केल्यानंतरही इस्रायलने लेबनॉनवर हल्ले सुरू ठेवले आहेत. इस्रायल डिफेंस फोर्सने दक्षिणी लेबनॉनच्या हेझबलाच्या ठिकाणांवर लिमिटेड ग्राऊंड ऑपरेशन सुरू केले आहे. राजकीय नेतृत्त्वाच्या निर्णयानुसार काही तासांपूर्वी आयडीएफने दक्षिण लेबनॉनमधील हेझबोला दहशतवादी लक्ष्य आणि पायाभूत सुविधांच्या विरोधात मर्यादित, स्थानिकीकृत आणि लक्षित जमिनीवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. या हल्ल्यांमध्ये सीम `जवळील गावे लक्ष्ये करण्यात आली आहेत. यामुळे उत्तर इस्रायलमधील इस्रायली समुदायांना त्वरित धोका निर्माण करतात. दरम्यान इस्रायलने लेबनॉनच्या दक्षिण बैरुतमधील हेझबोलाच्या मुख्यालयावर शुक्रवारी केलेल्या हल्ल्यामध्ये त्यांचा प्रमुख हसन नरसल्ला ठार झाला. यामुळे एका मोठ्या दहशतवाद्याचा अंत झाल्याचं म्हटलं जातंय. परंतु, अद्यापही येथे चकमकी सुरूच आहेत. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेन्यामिन नेतान्याहू यांच्याशी चर्चा केली.

## युवकावर झाडल्या चार गोळ्या...

(पान १ वरून..) आहे. इतर तीन गोळ्या काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले आहे. खोल जखमेत एखादा झरा अडकला असण्याची शक्यता असल्याने सिटी स्कॅाॅन करण्यात येणार आहे. राहूल याची प्रकृती चांगली आहे.

इंदापूर शहरात राहूल अश-ोक चव्हाण पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र चालविनारा युवक आज सोमवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास इंदापूर महाविद्यालयासमोर असताना, अज्ञात इसमाने पाठीमागून येऊन गावठी पिस्तुलाच्या सहाय्याने चार गोळ्या झाडल्या. घटनेनंतर अज्ञात इसम फरार झाला इंदापूर पोलिसांनी अवघ्या दिड तासात आरोपीस वालचंदनगर परिसरातुन एक मोटारसायकल व गुन्ह्यात वापरलेले गावठी पिस्तुल ताब्यात घेतले आहे. अवघ्या दिड तासात आरोपीस पकडुन ताब्यात घेतल्याने इंदापूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निर्णयांचा धडाका; अनुकंपा धोरणासह ....

(पान १ वरून..) झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना. धारावी पुनर्वसन प्रकल्पावर जबाबदारी (गृहनिर्माण विभाग) सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख (वित्त विभाग) अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होणार (कृषी विभाग) सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ (इतर मागास बहुजन कल्याण) जामखेडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सूत गिरणीला अर्थसहाय्य करणार (इतर मागास बहुजन कल्याण) राज्यातील होमगार्डांच्या भत्त्यात भरीव वाढ. सुमारे ४० हजार होम गार्डना लाभ (गृह विभाग) नाशिकचे वैद्यकीय पदवी महाविद्यालय व रुग्णालय शासनाच्या अखत्यारीत घेणार (वैद्यकीय शिक्षण) असे विविध निर्णय मंत्रिमंडळाने घेतले आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम, जलसंधारण आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभियंता पुरस्कार वितरण

## अक्कलकोट येथील एम.आर.मसुती यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : ग्राम ीण भागातील सामान्य लोकांच्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या रोटी, कपडा व मकानसाठी झेडपी अभियंत्यांचे योगदान महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.






अभियंता दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम, जलसंधारण आणि ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभियंता पुरस्कार वितरण प्रसंगी ते बोलत होते. फडकुले सभागृहात सोमवारी आयोजित कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, संतोष कुलकर्णी, संजय धनशेट्टी, संजय पारसे, उपअभियंता सुनील कटकधोंड, श्रीमती बिटला, अभियंता संघटनेचे अतुल सरडे, पंडित भोसले आदी उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते सर विश्वेश्वरय्या मोक्षगुंडम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी स्व-ागत केले. जबाबदारीने व बिनचूकपणे काम करणे हीच अभियंत्याची खरी ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे यांनी कार्यक्रम आयोजनाम ागचा हेतू सांगितला. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी यंदा अभियंत्याबरोबरच त्यांना कामात मदत करणाऱ्या टेंडर क्लार्क व सहाय्यकांचाही समावेश करण्यात आल्याचे स्पष्ट केले. कार्यकारी अभियंता संजय पारसे यांनी जलसंधारणचे अभियंते ग्रामीण भागात दुर्गम ठिकाणी जाऊन काम करतात. कशाची तमा न बाळगता शेतीसाठी त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. निवृत्त कार्यकारी अभियंता पंडित भोसले यांनी सोला-पूर जिल्ह्यात ७५ च्या दुष्काळात तयार झालेले तलाव आहेत. आता बांधावर गवत व झाडी वाढलेली आहे. अशा ठिकाणी झेडपीचे अभियंता सेवा देतात. त्यांचे काम खूप मोठे आहे. या अभियंत्याशिवाय शासनाच्या योजना यशस्वी होऊ शकत नाहीत. त्यामुळे सीईओ कुलदीप जंगम यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करून राज्यस्तरीय अभियंता पुरस्कार सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी अभियंते म्हणजे जिल्हा परिषदेच्या विकासाची चाके आहेत असे सांगितले. ग्रामीण भागाच्या विकासात अभियंते मोलाची कामगिरी बजावतात. गेल्या वर्षभरात बांधकाम, जलसंधारण व जलजीवनम ध्ये अभियंत्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीचा त्यांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला. सर्वांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा आवर्जून उल्लेख सीईओ जंगम यांनी आपल्या भाषणात केला. जीवनासाठी काय लागते, रोटी, कपडा, मकान हे महत्त्वाचे अंग आहे. शेतीला लागणारे पाणी, घर उभारण्यासाठी लागणारी यंत्रणा आणि कपड्याची मशिनरी या सगळ्यांच्या निर्माणमध्ये अभियंताचे योगदान आहे. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी धरण व इतर अनेक प्रकल्पामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. त्यांचा आदर्श घेऊन झेडपीच्या अभियंत्यांनीही काम करणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त केली. सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे अभियंत्यांना चॅलेंज आहे. आपण एका समाजामध्ये सर्व लोकांसोबत काम करतो. सरपंच, ग्रामसेवक सदस्य व नागरिक या सर्वांना सोबत घेऊन काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषद बांधकाम वि.क्रं.१ व २, जलसंधारण विभाग व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडुन दि.१५ सटेंबर अभियंता दिना निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये आदर्श अभियंता पुरस्कार सन २०२३-२४ चा वितरण समारंभ निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे घेण्यात आले आहे.

जिल्हा परिषद, सोलापूर मुख्यालयात उत्कृष्ट काम करणा-या अतांत्रिक कर्मचारी यांना सुध्दा विशेष पुरस्काराने सन्माननीत करण्यात आले. त्याअनुषंगाने जि.प व तालुकास्तरावरून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे छानणी करूनशाखा अभियंता कनिष्ठ अभियंताना आदर्श अभियंतासाठी निवड करण्यात आले होते . स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व कनिष्ठ आरेखक इ.सवंर्गातून कर्मचा-यांना आदर्श अभियंताची सन्मान करण्यात आले. तसेच तांत्रिक विभागात कार्यरत अतांत्रिक अधिकारी / कर्मचा-यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्तमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. व सदर कार्यक्रमासाठी पात्र असलेले खालील. कर्मचा-यांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले १) श्री.जी.एल. वाघमारे,उपअभियंता बांधकाम क्रं २ जि.प.सोलापूर २) श्री. कन्हेरे मारुती,कनिष्ठ अभियंता बांधकाम क्रं २ जि.प. सोलापूर ३) श्री.एस.जी देशपांडे,कनिष्ठ अभियंता बांधकाम क्रं २ जि.प. सोलापूर ४) श्री. बी.व्ही.पवार,कनिष्ठ अभियंता बांधकाम क्रं २ जि.प. सोलापूर ५) श्री.व्ही.एम.भूमकर,कनिष्ठ अभियंता बांधकाम क्रं २ जि.प. सोलापूर ६) श्री.ए.बी.थोरात,स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,बांधकाम क्रं २ जि.प. सोल-ापूर ७) श्री.एम.जी. मस्के,स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,बांधकाम क्रं २ जि.प. सोलापूर ८) श्री.डब्ल्यु.एम. शेख,उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर ९) श्री.एस.आर. पुजारी, कनिष्ठ अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर १०) श्री.बी.डी. वाहेकर, कनिष्ठ अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर ११) श्री.व्ही. एस. माळी,स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर १२) श्री. डी. बी. वाघमारे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर १३) श्रीम. एस.ए.पोरेडी,कनिष्ठ अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. सोलापूर १४) श्री.एस.एस. पारसे,उपअभियंता १५) श्रीम. नदाफ,कनिष्ठ अभियंता जलसंधारण विभाग सोलापूर जलसंधारण विभाग १६) श्री. दत्तात्रय जगन्नाथ कांरडे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक जलसंधारण विभाग १७) श्री.एस.टी. नागणे हजेरी सहाय्यक,जलसंधारण विभाग सोलापूर १८) श्री.पी.बी.निमसे,हजेरी सहाय्यक जलसंधारण विभाग सोलापूर १९) श्री.एम.एन. पाटोळे, हजेरी सहाय्यक,जलसंधारण विभाग सोलापूर २०) श्री.एम.आर.मसुती (उत्कृष्ठ अभियंता) कनिष्ठ अभियंता उपअभियंता जि.प.उपविभाग बांधकाम, अक्कलकोट २१) श्री.एल.ए.काळे (उत्कृष्ठ अभियंता) कनिष्ठ अभियंता उपअभियंता जि.प.उपविभाग बांधकाम, माढा २२) श्री.व्ही. वाय. कोंडगुळे (उत्कृष्ठ अभियंता)कनिष्ठ अभियंता उपअभियंता जि.प.उपविभाग बांधकामद. सोलापूर २३) श्री.एस. के. मस्के (उत्कृष्ठ अभियंता)स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक,उपअभियंता जि.प.उपविभाग बांधकामद. सोलापूर २४) श्री.एस. आर. भडकवाड,कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग क्रं १ २५) श्री. के. आय. शेख,कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग क्रं १ २६) श्रीम. आर.एस. जाधवर,कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग क्रं १ २७) श्री.टी. एस. गायकवाड उत्कृष्ठ कर्मचारी मजूर, बांधकाम विभाग क्रं १ २८) श्री.ए.डी. गोडसे सहाय्यक प्रशासन अधिकारी बांधकाम विभाग क्रं १ २९) श्री.एम. के. कोरे कनिष्ठ प्रशासन अधिकारी बांधकाम विभाग क्रं १ ३०) श्री.पी.एस. बिराजदार वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ३१) श्रीम. एस.एस. म्हेत्रे वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ३२) श्री.एन.एस. कुटे वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ बांधकाम विभाग क्रं १ ३३) श्री.व्ही. व्ही. घोगरे कनिष्ठ सहाय्यक ३४) श्रीम. ए.आर. बनसोडे परिचर, बांधकाम विभाग क्रं १ ३५) श्री.पी.आर.बनसोडे,वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ३६) श्री.पी.बी. लंगोटे वरिष्ठ सहाय्यक लेखा बांधकाम विभाग क्रं १ ३८) श्री. महेश सुतार श्री. अमित सलगर कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ क.ले.अ बांधकाम विभाग क्रं १ ३९) श्रीम.व्ही. एस. शिंदे कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४०) श्रीम.ए.एस.निराळी, परिचर बांधकाम विभाग क्रं १ ४१) श्री.झेड. ए. शेख, उत्कृष्ठ कनिष्ठ प्रशासन अधिकारी बांधकाम विभाग क्रं १ ४२) श्री.एम.डी.पंतगे, उत्कृष्ठ ई-निविदा लिपिक वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४३) श्री.व्ही. सी.शेंडगे, उत्कृष्ठ लेखा सहाय्यक कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४४) श्री.एस.डी. म्हमाणे, परिचर बांधकाम विभाग क्रं १ उत्कृष्ठ ४५) श्री.आर.जे. सोडडे उत्कृष्ठ लिपिक वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४६) श्री.डी. पी. समदुलें गुणवंत कर्मचारी वरिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४७) श्री.पी. के. देवळे गुणवंत कर्मचारी कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४८) श्री.आर.बी.गुरव क. सहा उत्कृष्ठ लिपिक कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ४९) श्री.एस.एन.पवार क. सहा उत्कृष्ठ लिपिक कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १ ५०) श्री.ए.एस. व्हाटकर कनिष्ठ सहाय्यक बांधकाम विभाग क्रं १

याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या तिन्ही विभागातील ५० अभियंते व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांतर्फे भूमकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले. आभार कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश गोडसे, झहीर शेख, संजय कांबळे, चेतन वाघमारे, वीरुपक्ष जेऊरे, म्हमाने,वेदपाठक, शशिकला म्हेत्रे, जोत्स्ना साठे, चेतन भोसले यांनी परिश्रम घेतले.

## लोक अदालतीमध्ये तडजोडीअंती १० हजार ९९० प्रकरणे निकाली

(पान १ वरून..) मिळकत धारक व गाळे धारक यांचे लोकन्यायालयात यशस्वी होण्याकरीता मोलाचे सहकार्य लाभले.

सदर पॅनलचे आयोजन म हानगरपालीका आवारातच करण्यात आले होते. व त्याकरीता पॅनल प्रमुख म्हणुन पी.पी.पेठकर व पॅनल विधिज्ञ म्हणून रेवण पाटील यांनी काम पाहिले. सदर लोकअदालतीम ध्ये महानगरपालिकेचे १ हजार ८०१ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीअंती निकाली असून रक्कम रुपये १२ कोटी २३ लाख ७६ हजार २७७ इतकी कर भाडे पोटी आकारणी झालेली आहे.

मोटार वाहन प्रकरणे सदर लोकअदालतीमध्ये शहर वाह-तुक शाखा व ग्रामीण वाहतूक शाखा सोलापूर यांचे प्रकरणेकरीता स्वतंत्र पॅनेल निर्माण करण्यात आले. पॅनल प्रमुख म्हणून श्रीमती डी.डी. कोळपकर यांनी काम पाहिले. सदर पॅनलवर ८ हजार ९५४ इतकी प्रकरणे तडजोडी करीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी २ हजार ३२८ इतकी प्रकरणे निकाली काढण्यात आली त्यापोटी २१ लाख ८ हजार ६१० इतकी रक्कम वसूल करण्यात आली. सदर पॅनलेचे कामकाज यशस्वी करण्याकरिता सहायक पोलीस आयुक्त श्री.खिराडकर, सहायक अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.राजन माने, पोलीस निरिक्ष श्री.तानाजी दराडे, पोलीस निरिक्षक श्री.उदय पाटील तसेच सर्व वाहतूक नियंत्रण शाखेतील सर्व अधिकारी,पोलीस कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

बँक व वित्तीय संस्था, शहरा-तील विविध बँक अधिकारी व बँकेचे विधीज्ञ यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच सदर लोक न्यायालयामध्ये शहर पोलीस व वाहतुक नियंत्रण शाखा यांनी चोख बंदोबस्त नेमूण गर्दीवर नियंत्रण करण्यास मदत केली. महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान यांनी सुध्दा सहकार्य केले.

सदर लोकन्यायालयाची मुद्देस-ुद माहिती खालील प्रमाणे- एकूण प्रलंबित ठेवलेली प्रकरणे ३९ हजार ११० एकूण तडजोड झा-लेली प्रलंबित प्रकरणे ४ हजार ६०७ प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम ६०,८५,५२,६१३,

तसेच दाखलपूर्ण प्रकरणे एकूण दाखलपूर्व प्रकरणे ५१ हजार ४३५ एकूए तडजोड झालेली दाखल-पूर्व प्रकरणे ६ हजार ३८३ दाखल-पूर्व प्रकरणातील तडजोड रक्क्कम २०,कोटी ८५ लाख ५२ हजार ६१३ ऑनलाईन व व्हॉटसअप च्या मदतीने तडजोड प्रकरणे २५ तेडजोड झालेली वैवाहिक प्रकरणे ३४

तालुका विधी सेवा समितीचे प्रकरणे सोलापूर ५ हजार ९१८ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम रक्कम रुपये ४७०२,९४,१३९ अक्कलकोट ७३२ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ९२ लाख ७ हजार ३९२ बार्शी २ हजार ६६९ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ४ कोटी ९७ लाख ५४ हजार २२० माढा २७६ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ५ कोटी ७५ लाख १८ हजार २५३ मोहोळ ७३ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम २ कोटी ८३ लाख ५४ हजार ६४८ माळशिरस एकूण तडजोड झालेली प्रकरणे ३३३ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ५ कोटी ९४ लाख ९१ हजार ७७७, मंगळवेढा तडजोड प्रकरणे २५१ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम १ कोटी ७६ लाख २८ हजार ०९४, पंढरपूर तडजोड प्रकरणे १७९ एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ८ कोटी २१ लाख ८९ हजार ९११, करमाळा तडजोड प्रकरणे १६० एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम २ कोटी ८९ लाख ८४ हजार ०७२, सांगोला तडजोड प्रकरणे ४०० एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ७१ लाख ५८ हजार ९५४ एकूण १० हजार ९९० प्रकरणे एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम ८१ कोटी ५ लाख ८१ हजार ३६० असे अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांनी कळविले आहे.

## वागदरी जिल्हा परिषद गटातील बूथ अध्यक्ष व बूथ समितीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर भारतीय जनता पार्टी सोल-ापूर जिल्हा पूर्वचे प्रभारी खा-सदार श्री इरण्णाजी कडाडी तसेच अक्कलकोट विधानसभाचे प्रभारी श्री चंद्रकांत पाटीलजी यांच्या उपस्थितीत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील वागदरी जिल्हा परिषद गटातील सांगवी,शिरवळ,शिरवळवाडी, वागदरी,गोगाव,खैराट,भुरीकवठा येथील बूथ अध्यक्ष व बूथ समितीची बैठक संपन्न झाली.या बैठकीमध्ये निवडणुकीच्या तयारीबाबत विविध विषयावर चर्चा झाली..

यावेळी अक्कलकोट भाजप तालुकाध्यक्ष श्री मोतीराम राठोड,

### खासदार इरण्णाजी कडाडी यांनी घेतले बूथ प्रमुखाचे आढावा



विधानसभा निवडणूक प्रमुख श्री राजकुमार झिंगाडे, विधानसभा संयोजक श्री प्रदीप पाटील सर सोलापूर मध्ये चे प्रभारी श्री उदयशंकरजी पाटील,श्री बाळास-ाहेब भोसले,श्री बकर शेख, श्री आप्पासाहेब बिराजदार ,श्री हणमंत घोदे,श्री बसवराज शेळके ,श्री शाणप्पा मंगाणे ,श्री धोंडाप्पा यमाजी,श्री बसवराज पाटील,श्री राजकुमार मंगाणे,श्री संतोष पोम ाजी,श्री प्रकाश पोमाजी, श्री महादेव सोनकवडे, शारदाताई रोटे,जयश्री बटगेरी, श्री प्रदीप जगताप ,श्री कमलाकर सोनकांबळे,श्री सिद्धाराम मठपती,श्री सचिन घुगरे,श्री श्रीमंत कुंटोजी,श्री मल्लिनाथ शिदोरे व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते..

## भारत निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या विधानसभा निवडणूक नियोजनाचे कौतुक

(पान १ वरून...)

महिला मतदान नोंदणी कमी आहे जेंडर रेशो ९२७ पेक्षा अशा ठिकाणी तलाठी , ग्रामसेवक, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका म हिला बचत गट यांचे मार्फत शिबिरे घेतली. नवीन विवाह झालेल्या महिलांची गावात नोंद करून घेण्यासाठी ही नियोजन करण्यात आलेले आहे.

प्रांताधिकारी, तहसीलदार , नायब तहसीलदार संबंधित मतदान केंद्रावर भेटी देऊन जास्तीत जास्त महिलांची मतदार म्हणून नोंदणी होण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे मतदार यादी चा जनरल रेशो ९३१ वरून ९४८ पर्यंत वाढण्यास मदत झालेली आहे.

**ग्राम सुरक्षा यंत्रणा:-** म तदानाच्या दिवशी दर दोन तासांनी आकडेवारी येते ज्या गावात आणि मतदान केंद्रावर जिथे मतदान कमी असेल त्या ठिकाणी जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी स्वतः ग्राम सुरक्षा यंत्रणेमार्फत मतदान करण्यासाठी फोन कॉल करून आठवण करून देणार आ-हेत. तसेच तलाठी ग्रामसेवक इङ्ज मार्फत प्रत्यक्ष मतदार यांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक गावाच्या व्हाट्सअप ग्रुप वर मतदान करण्यासाठी मेसेज करण्यात येणार आहेत. महिला मतदारांची नोंदणी व ग्राम सुरक्षा यंत्रणा मार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी केलेल्या नियोजनाची दखल मुख्य निवडणूक आयुक्त यांनी घेतली. या कामासह अन्य निवडणुकीच्या अनुषंगाने कामकाजात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद लक्ष घालत असल्याने नियोजन चांगल्या प्रकारे झालेले आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा निवडणूक प्रशासनाने विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या विविध कामाचे सादरीकरण आयोगासमोर सादर केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### लोकशाही दिनाचे ७ ऑक्टोबरला आयोजन

सोलापूर (जिमाका) : जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

### पात्र हजेरी सहायकांनी निवृत्तीवेतनार्ह लाभासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : शासनाच्या नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र हजेरी सहायक यांना निवृत्तीवेतनार्ह लाभ देण्याचे आदेश दिले आहेत , जिल्ह्यातील सदर शासन निर्णयानुसार सेवानिवृत्तीविषयक लाभ देणेसाठी आढळ होत नसलेले ६२ हजेरी सहायक यांची यादी solapur.nic.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली आहे. तरी या यादीमधील हजेरी सहायक यांनी शासन निर्णय , दि. २३ मे २०२३ मधील निर्णयानुसार निवृत्तीवेतनार्ह लाभ घेण्यासाठी त्यांच्या सेवानिवृत्त कार्यालयाशी किंवा जिल्हाधिकारी कार्यालय रोजगार हमी योजना शाखेशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी रोहयो श्रीमती अंजली मरोड यांनी केले आहे.


### ग्रेट इंडियन फेस्टिव्हलची मोठी ओपनिंग

सोलापूर : ॲमेझॉन ग्रेट इंडियन फ स्टिव्हल,२७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून प्राइम मेंबरसाठी २४-तास आधी उपलब्धता मिळाली,मेझॉन डॉट इनवर त्याचे विक्रेते आणि ब्रँड भागीदारांना आतापर्यंतची सर्वात मोठी ओपनिंग प्राप्त झाली आहे. ॲमेझॉन इंडियाचे श्रेणी विभागाचे उपाध्यक्ष सौरभ श्रीवास्तव म्हणाले,मेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्ह २०२४ चे पहिले ४८ तास मेझॉन डॉटवर साठी ऐतिहासिक आणि आतापर्यंतचे सर्वोत्तम ठरले आहेत! ११ कोटी ग्राहकांच्या विक्रमी भेटी आणि पीईएदरम्यान सर्वाधिक संख्येने प्राइम मेंबर्सने खरेदी केलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे ओपनिंग बघुन आम्हीच आश्चर्यचकित झालो आहोत.

### महाराष्ट्रातील कुशल कामगारांना कामाची संधी

सोलापूर : जर्मनीच्या बाडेन-वुर्टेम्बर्ग राज्याने आपली 'लँड हिअर' ही मोहीम महाराष्ट्रात सुरू केली आहे.महाराष्ट्र व बाडेन-वुर्टेम्बर्ग या दोन राज्यांतील गेल्या अनेक दशकांच्या सहकार्यावर आधारित ही मोहीम परस्परसंबंध भक्कम करेलच;परंतु जर्मनीतील कुशल कामगारांच्या वाढत्या गरजेचीही पूर्तता करेल.बाडेन-वुर्टेम्बर्ग आणि महाराष्ट्रातील संबंध दशकानुदशके भरभराटीला आले असून त्यांची उभारणी परस्पर आर्थिक,शैक्षणिक व सांस्कृतिक सहकार्यावर झाली आहे. वर्ष १९६८ पासून बाडेन-वुर्टेम्बर्ग राज्याची राजधानी स्टुटगार्टने मुंबईसमवेत सिस्टर-सिटी पार्टनरशिप सहयोग राखला आहे.यंदा दोन्ही राज्यांनी कुशल कामगार भर्ती व व्यावसायिक प्रशिक्षण यात सहकार्याच्या हेतूने उचित स्थलांतर प्रथांबाबत परस्पर बांधीलकी ठळक करणाऱ्या एका संयुक्त जाहीरनाम्यावर सह्या केल्या.

# मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यास शासनाची मंजुरी : गहिनीनाथ महाराज औसेकर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यास होण्या-या अतिरिक्त खर्चास शासनाने मंजुरी दिल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांची सेवा मंजुर आकृतीबंधानुसार माहे जानेवारी, २०१९ पासून संरक्षित केली आहे. तसेच माहे जून, २०१९ पासून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू केली आहे. मात्र, आस्थापनेवरील खर्चास १०% ची मर्यादा असल्याने ५०%, ७५% व १००% महागाई भत्ता व ५% घरभाडे भत्ता देण्यात येत होता. तथापि, मंदिर समितीने सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना २०३% महागाई भत्ता व १०% घरभाडे भत्ता लागू केला आहे. मात्र, दि.०३/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीतील महागाई व घरभाडे भत्त्याच्या फरक दिलेला नव्हता. तसेच शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन व भत्ते देण्याबाबत कर्मचा-यांकडून वारंवार मागणी होत होती.

आषाढी एकादशी दिवशी म्हणजे दिनांक १७ जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची शासकीय महापूजा करण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरला आले होते. त्यावेळी आस्थापनेवरील कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग मिळणेबाबत चर्चा करून विनंती केली होती. त्यावर त्यांनी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा, शासन सकारात्मक निर्णय घेईल असे आश्वासित केले होते. त्यानुसार मंदिर समितीच्या सभेत निर्णय घेऊन धर्मादाय आयुक्त यांच्या मंजुरीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तद्नंतर सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दि.२० सप्टेंबर रोजी मंत्रालय येथे व दि.२१ सप्टेंबर रोजी पुणे येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली होती. त्यास दि. ३० सप्टेंबर रोजी शासनाने मंजुरी दिली आहे.

मंदिर समितीच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत विविध संवर्गातील २२५ कर्मचारी कार्यरत आहे. या कर्मचा-यांना सध्या सहावा वेतन आयोग लागू आहे. आता शासनाच्या मंजुरीने ७ वा वेतन आयोग लागू होऊन प्रतिमहा ७ ते १० हजार इतकी भरघोस वेतनवाढ होणार आहे. त्यासाठी मंदिर समितीचा प्रतिवर्षी एक ते दिड कोटी इतका अतिरिक्त खर्च वाढणार आहे. याशिवाय, दि.०३/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगातील भत्त्याच्या फरकाची रक्कम देखील कर्मचा-यांना मिळणार आहे. याबाबत कर्मचा-यांकडून आनंद व्यक्त होत आहे. या कर्मचा-यांच्या सेवा १० ते ३० वर्षे झालेल्या आहेत असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

समिती कर्मचा-यामार्फत श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेचे पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवतांची मंदिरे यांचे व्यवस्थापन करण्यात येते. यासर्व देवदेवतांची पुजा-अर्चा, नित्योपचार, नैमत्तिक उपचार तसेच वर्षातील ४ उत्सव नियमितपणे पार पाडण्याची जबाबदारी कर्मचा-यांवर आहे. तसेच दर्शनरांग व्यवस्था, अन्नछत्र, गोशाळा, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, चप्पलस्टँड, मोबाईल लॉकर, सुरक्षा व इतर अनुषंगीक अशा विविध प्रकारच्या पुरेसा सोई सुविधा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामुळे कर्मचारी सेवाभावाने व वेळेचे बंधन न ठेवता उपरोक्त कामे करीत असतात. सदर कर्मचा-यांची सेवा संरक्षित होऊन देखील कमी वेतन मिळत असल्यामुळे व वाढत्या महागाईमुळे कर्मचारी आर्थिक विवंचनेत होते. मंदिर समितीने आस्थापनेवरील कर्मचा-यांना गणवेश, ओळखपत्र, सेवा शर्ती लागू करणे, अनुकंपा नियमावली, कर्तव्य सुची निश्चित करून देणे, विमा पॉलीसी अशा प्रकारच्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

सदर प्रस्ताव मंजुरीसाठी धर्मादाय आयुक्त कार्यालय व मंत्रालय स्तरावर मंदिर समितीचे सदस्य आ. रामचंद्र कदम, शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री व आस्थापना विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

> आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची सन २०१९ मध्ये सेवा संरक्षित करून मागील वर्षी सहावा वेतन आयोग व यावर्षी मागील फरकासह सातवा वेतन आयोग मंदिर समितीने लागू केल्याबद्दल मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सर्व सदस्य व अधिकारी तसेच विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच शासनाचे मनःपूर्वक आभार.....!
>
> **विनोद पाटील,**
>
> अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांची संघटना पंढरपूर.

## टाकळीवाडी सुपुत्र राहुलकुमार बस्तवाडे याची गगन भरारी



शिरोळ/नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील आप्पासो बस्तवाडे यांचे चिरंजीव राहुलकुमार आप्पासो बस्तवाडे यांची जलसंधारण अधिकारी जलसंधारण विभाग (class 2), स्थापत्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थापत्य अभियंता जिल्हा परिषद,,स्थापत्य अभियंता पाठबंधारे विभाग पदी एकाच वेळी निवड झाली आहे.

समस्त मित्रमंडळी यांच्या वतीने केक कापून आनंद साजरा करण्यात आला. सर्व मित्रमंडळी, पाहुणे,यांच्याकडून शुभेच्छा देण्यात आल्या. यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यावेळी राजकुमार चे आई ,वडील,भाऊ, मित्रपरिवार उपस्थित होता.

## सरपंच वनिता सुरवसे यांना राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : अविष्कार सोशल अँड एज्युकेशन फाउंडेशन इंडियाच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने राज्यभरातील शिक्षकांचा सन्मान सोहळा सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. शिक्षक सरपंच आणि उद्योजक अशा तिन्ही क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या मान्यवराचा सन्मान अविष्कार चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या सोहळ्यात अक्कलकोट तालुक्यातील गोगावच्या सरपंच सौ वनिता सुरवसे यांचा राज्यस्तरीय यशवंत गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेश उपाध्यक्ष एड. विकास जाधव यांच्या हस्ते आणि श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत येडेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचे पुरस्कार प्रदान केले.



सरपंच सौ वनिता सुरवसे यांना सरपंच परिषदेने सोलापूरच्या जिल्हा समन्वयक असुन परिषदेमार्फत सर्व सरपंचांना मार्गदर्शन करत वेगवेगळ्या आंदोलनात सरकारला वेठीस धरून मागण्या पूर्णत्वास आणल्या. त्यांच्या गावामध्ये मोठ मोठी कामे करून अक्कलकोट तालुक्यातचं नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात गोगाव ग्रामपंचायत चे नाव उज्वल केले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, पदमश्री श्री पोपटराव पवार, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे उपाध्यक्ष एड. विकास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक चिरंजीव कामे ग्रामपंचायत मध्ये करून ग्रामपंचायतचा महसूल तिपटीने वाढविला. महाराष्ट्रातील ग्रामविकास मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय कृषिमंत्री, केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना निवेदन देऊन ग्रामपंचायत च्या अडचणी सांगितल्या.वेळोवेळी त्यांचे केलेले काम पाहून, कामाची दखल घेऊन अविष्कार फाउंडेशनने त्यांना राज्यस्तरी यशवंत गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्याबद्दल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री संजय पवार व अन्य मान्यवरांचे सरपंच सौ वनिता सुरवसे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहे.

या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते उमेश पाटील, अविष्कार चे जिल्हाध्यक्ष श्री सात पटेल, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष श्री मनोज कंगळे, जिल्हा संघटक सौ स्नेहल खंकाळ, रेखा सोनकवडे, ए बी शेख,जब्बार सिकलगार, शंकरराव देशमुख,संतोष गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन श्री संजय घोडके सर यांनी केले.

## मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा 3 ऑक्टोबर पासून गाव भेट दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांच्या तीन ते सहा ऑक्टोबर २०२४ च्या दरम्यान मतदारसंघात गाव भेट दौरा करणार आहेत. गुरुवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ पासून दुपारी तीन वाजता पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील ग्रामदैवत सिताराम महाराज यांची दर्शन घेऊन सुरू होणार आहे. पुढे सायंकाळी सहा वाजता तपकिरी शेटफळ रात्री सात वाजता तनाळी रात्री आठ वाजता तावशी, शुक्रवार दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी आठ वाजता सिद्धेवाडी, सकाळी नऊ वाजता शिरगाव, दहा वाजता एकला स्पर्ट सायंकाळी पाच वाजता आणवली सहा वाजता राणी सात वाजता मुंढेवाडी आठ वाजता गोपाळपूर शनिवारी दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी आठ वाजता उंबरगाव सकाळी नऊ वाजता भवानी दहा वाजता कुर्ती सायंकाळी पाच वाजता टाकळी सात वाजता गादेगाव रविवार दिनांक ७ नंबर २०२४ रोजी सकाळी राज्यातील मनसेचे पहिले उमेदवार म्हणून मनसेचे नेते दिली बापू धोत्रे यांनी उमेदवारी जाहीर केली. आठ वाजता शिरडून नऊ वाजता कवठळी सायंकाळी सहा वाजता वाखरी सायंकाळी सात वाजता कासेगाव असा दौरा असणार आहे



या दरम्यान मनसेची दिलीप बापू धोत्रे जयंतीची हितगुड साधून समस्या जाणून घेणार व सोडवण्याचा प्रयत्न करणार आहेत. दिलीप बापू धोत्रे यांनी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदार संघातील जनतेशी नाळ जोडले आहे त्यामुळे विधानसभा निवडणुकीत त्यांचे मोठे आव्हान असणार आहे

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान स्पर्धेत बी. बी. पाटील हायस्कूल भिवंडी तालुक्यात प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील कुंरूद येथील बी. बी पाटील इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनियर कॉलेजने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाअंतर्गत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.




निसर्गाच्या सान्निध्यात शाळेची प्रशस्त इमारत, वर्गखोल्या, दर्जेदार शिक्षण, स्वच्छता, शैक्षणिक वर्षात प्रभावीपणे राबविण्यात येणारे शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक उपक्रम, दहावी, बारावी १०० टक्के निकाल शाळेच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अभियानाअंतर्गत खाजगी व्यवस्थापनाच्या शाळाममधुन तालुकास्तरावर भिवंडी ग्रामीण विभागातून बी. बी. पाटील इंग्लिश मिडीयम हायस्कूल व ज्युनियर कॉलेजची प्रथम क्रमांक म्हणून निवड झाली असुन स्पर्धेचे तिन लाख रुपयांचे बक्षीसही पटकावले आहे. प्रथम क्रमांकांची निवड होताच हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष बी. बी. पाटील मुख्याध्यापिका मोनिका मराडे, अनामिका पाटील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी आंनद व्यक्त करुन जल्लोष साजरा केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटनाने ऐतिहासिक क्षण | सोलापूर विकास मंचचा सातत्यपूर्ण लढा

# सोलापूर विकास मंचमुळे सोलापूरकरांचे विमानसेवेची स्वप्नपूर्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर ( प्रतिनीधी ) : सोलापूरचे होटगी रोड विमानतळ, ज्याची प्रतीक्षा अनेक वर्षांपासून सोलापूरकर आणि आसपासच्या जिल्हांच्या लोकांना होती, अखेर तो क्षण आज त्यांनी अनुभवला. सोलापूर विकास मंचच्या अथक प्रयत्नांमुळे हे यश मिळाले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळावरून नागरी विमानसेवा ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन संपन्न झाले.

सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र, राज्य आणि स्थानिक प्रशासनाच्या दरबारी विविध निवेदने सादर करून ह्या विमानसेवेची मागणी केली होती. अनेक युनिक आंदोलने, ३१ दिवसीय तीव्र लाक्षणिक चक्री उपोषण, मुक मोर्चा, रस्त्यावर उतरणे, आणि प्रसंगी पोलिसांच्या केसला सामोरे जाणे, हा मंचचा संघर्षमय प्रवास होता. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच आज हा ऐतिहासिक क्षण साकारला आहे.

प्रादेशिक लाभ: सोलापूरसह तीन जिल्ह्यांना फायदा

होटगी रोड विमानतळाच्या सुरूवातीमुळे फक्त सोलापूर शहराचाच नाही, तर धाराशिव, लातूर आणि उत्तर विजापूर येथील एकूण एक कोटी लोकसंख्येला या विमानतळाचा फायदा होणार आहे. या विमानसेवेच्या माध्यमातून या भागातील लोकांना दळणवळणाच्या सुविधांमध्ये मोठी सुधारणा होईल आणि व्यवसाय, रोजगार, तसेच पर्यटनाला चालना मिळेल. सोलापूरच्या आर्थिक विकासाला हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे

विमानसेवा सुरू होण्याची योजना

केंद्रीय नागरी उडय्यन मंत्रालयाच्या उडान स्कीम अंतर्गत सोलापूर-मुंबई, सोलापूर - नवी दिल्ली, सोलापूर - हैद्राबाद, सोलापूर - तिरुपती, सोलापूर - गोवा, सोलापूर - इंदौर सोलापूर - अहमदाबाद ह्या मार्गांवर नागरी विमानसेवा लवकरच सुरू होईल अशी आशा आहे. ज्यामुळे वेळ आणि खर्च वाचणार आहे. राज्य सरकारने देखील 'वायबिलिटी गॅप फंडिंग' (तत्रत्र्त्र) अंतर्गत तिकिटांच्या किमती कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत.

परिणामकारक विकासाची अपेक्षा

या विमानतळाच्या विकासामुळे सोलापूर आणि आसपासच्या भागांना नवी संधी मिळणार आहे. यामुळे फक्त दळणवळणाची सोय सुधारेल असे नाही तर व्यवसायिक आणि औद्योगिक विकासालाही गती मिळेल. हे विमानतळ सोलापूरच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील त्यांच्या उद्घाटन पर भाषणांत श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी तिर्थक्षेत्र पर्यटण आणि सोलापूरच्या औद्योगिक विकासाचा उल्लेख केला.




सोलापूर विकास मंच सोलापूरच्या विकासाशी निगडीत महत्त्वपूर्ण विषय केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवरुन सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्णपणे मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही ह्यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर तथा सोलापूर विकास मंचच्या वर्कींग कमिटी सदस्यांनी दिली.

## रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे मैंदर्गी शाखेचे अध्यक्ष सुनिल मनिकडे



अक्कलकोट /प्रतिनीधी : रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे मैंदर्गी शाखेचे अध्यक्ष सुनिल शरणप्पा मनिकडे तर उपाध्यक्ष भिमा बसवराज आरेनवरू, सचिव नितीन सुरेश आरेनवरू सहसचिव किरण तिपण्णा डुबेकर, खजिनदार हणमंत बसवराज शिंगे यांचे निवड करण्यात आले आहे या निवडीचे पत्र तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व युवक आघाडी जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे, रिपाइं अक्कलकोट शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे, शरणाप्पा मनिकडे, सुरेश सोनकांबळे आदी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात

### राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यपदी पराग शहा

सोलापूर : शैक्षणिक, सामाजिकस्तरावर मनापासून सेवा देणारे उद्योजक श्री. पराग शहा यांची महाराष्ट्र राज्यासंबंधित अल्पसंख्यंक समुदायाच्या सम स्यांनिवारणासाठी राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या तज्ज्ञ सल्लागार समितीचे सदस्य म्हणून नामांकन करण्यात आले आहे. अल्पसंख्यंक समाजाप्रती केलेल्या कामाची दखल घेऊन, भारत सरकार अल्पसंख्यंक वाणिज्य मंत्रालय, राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोग सदस्य धन्यकुमार जिनाप्पा गुंडे यांच्या शिफारसीने श्री पराग शहा यांची ही नेमणूक झाली आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोगाच्या धोरणात्मक निर्णयाद्वारे अल्पसंख्यंक समाजास शिक्षण, सामाजिक सेवा मि ळण्यास समस्या उद्भवू नये यासाठी श्री पराग शहा यांचे मोठे योगदान ठरणार आहे. अल्पसंख्यंक समुदाय आणि राष्ट्रीय अल्पसंख्यंक आयोग यांच्यातील सेतू बनून अल्पसंख्यंकांचे सर्वांगीण विकासकार्य पुढे नेण्यासाठी महत्त्वपूर्ण जबाबदारी श्री पराग शहा यांच्यावर असणार आहे. या निवडी बद्दल विद्यमान खा. प्रणिती शिंदे, वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांच्यासह जैन समुदायातील देशभरातील प्रतिष्ठितांकडून श्री पराग शहा यांचे अभिनंदन होत आहे.

### जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त जिल्हास्तरीय मेळाव्याचे १ ऑक्टोबरला आयोजन

सोलापूर (जिमाका) : राज्यात १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानूसार ज्येष्ठ नागरिकांसाठी मंगळवार दि. १ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता द्वारकाधीश मंदिर, जुळे सालापुर यथे जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी मेळाव्यास जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक, उपस्थित रहावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे, यांनी केले आहे.

# बांधकाम खात्याच्या भोंगळ कारभाराविरुद्ध प्रहारचे खड्ड्यामध्ये बसून आंदोलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

निफाड नाशिक छत्रपती संभाजी महामार्गावर सकाळी आठ वाजेच्या सुमारास आचोळा नाला येथे भरलेला कांदा ट्रक्टर पलटी झाला.धारणगांव खडक येथील शेतकरी तुकाराम जाधव ह्या शेतकऱ्यांचे मोठी अर्थिक हानी झाली. हा सर्व बेजबाबदारपणा आणि सार्वजनिक बांधकाम खात्याचा भोंगळ कारभाराचा परिणाम आहे.ह्या घटनेची दखल घेऊन प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाउपाध्यक्ष सागर निकाळे ह्यांनी त्याच साचलेल्या पाण्याच्या खड्ड्यामध्ये बसुन आंदोलन केले.

तसेच सदर घटनेस जबाबदार महाम ार्ग विभागाने सदर शेतकरी बांधवास अर्थिक नुकसान भरपाई द्यावी तसेच तातडीने महामार्गावरील सर्व खड्डे भ्रष्टाचार न करता व्यवस्थित मटेरिअल वापरून दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. आधीच पावसानँ सोयाबीन मका ह्या पिकांचा गाळ शेतकऱ्यांच्या माथी आसतांना परत शासनाच्या बेजबाबदार यंत्रणेमुळे त्यांना अशा घटनांचा फटका बसल्यावर त्यांनी न्याय कुणाकडे म ागायचा..बाप भिक मागु देईना आणि माय जेवायला वाढीना अशी गत आमच्या शेतकऱ्यांच्या नशिबी असेल तर हे आम्ही खपवुन घेणार नाही ..सदर शेतकऱ्याच्या नुकसान भरपाई करावीच लागेल आम्ही तोपर्यंत आंदोलन करत राहणार आसे मत सागर निकाळे यांनी व्यक्त केले याप्रसंगी ज्ञानेश्वर सांगळे.माणीक गायकवाङ .रविंद्र आहीरे.गोवींद आंबेकर.सचिन भोसले. आदी पदाधिकारी उपस्थितीत होते

# पडघा परिसरातून दोन अजगरांना जीवदान



भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील गावांमधून दोन मोठ्या अजगरांना पकडण्यात सर्पमित्रांना यश आले आहे. पडघा पाच्छापूर रस्त्यावरील तुळशी गावाजवळील उमेर चिखलेकर यांच्या गोट फार्ममध्ये आणि गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुकसे गाव-ातील शेतकरी बच्चू पाटील यांच्या शेतात अजगर असल्याची खबर समतानगर पडघा येथील सर्पमित्र रवी दांडगे व वांद्रे येथील सर्पमित्र मयुर बजागे, मोरेश्वर बजागे यांना मिळाली होती. त्यानुसार या दोन्ही मोठ्या अजगरांना सर्पमित्रांनी मोठ्या शिताफीने पकडून पडघा वनअधिकारी यांच्या उप-स्थितीत जंगलात सुरक्षित सोडून देण्यात दिले. कुकसे येथे पकडण्यात आलेला म ादी जातीचा अजगर आठ फूट लांब आणि १८ किलो वजनाचा होता. तर तुळशी येथील फार्मवर पकडलेला अजगर सहा फ ूट लांबीचा होता.




# शहर अभियंत्यांचा बनावट शिक्का.. ठाणेदार साहेब जरा द्या यांना धक्का..

**बिल्डिंग पेंटर बांधकाम व असंघटित मजूर संघाची मागणी**

तालुका प्रतिनिधी/मंगरूळपीर

३० सप्टेंबर रोजी मंगरूळपीर शहरातील मजूर संघाने मुख्याधिकारी व ठाणेदार यांना निवेदन देत शहरांमध्ये सुरू असलेल्या बोगस मजूर प्रमाणपत्राच्या वितरण संदर्भात कार्यवाही करण्याची मागणी केली. मंगरूळपीर शहरातील काही दलाल लोकांनी घरीच शहर अभियंत्यांचे शिक्के बनवून ठेवले असल्याची चर्चा नगरपरिषद कार्यालयात दबक्या आवाजात होत असायची. या चर्चेला दुजोरा देत बिल्डिंग पेंटर व असंघटित मजूर संघाचे वतीने ठाणेदार व मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले त्यामध्ये असे नमूद केले गेले की शहरांमध्ये मजूर प्रमाणपत्र वितरण होत असताना पात्र व गरजू लाभार्थी यांच्यावर अन्याय होत बोगस तसेच आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांनाही मजूर प्रमाणपत्र देण्यात येत आहे. सदर बाब ही शासनाची प्रशासनाची दिशाभूल करणारी असून यामध्ये शहरातील काही दलाल मंडळी यांनी काही अधिकारी यांना हाताशी धरून हा प्रकार चालवला आहे. यावर प्रशासनाच्या वतीने कडक कार्यवाही होणे अपेक्षित आहे. म्हणून मजूर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाला निवेदन दिले.

# खेळ पैठणीचा ते शेतकरी मेळावा घेत अभिजीत पाटील यांनी मतदारसंघ गाजवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभेची निवडणूक कधीही लागू शकते जसजशी निवडणूक जवळ येते आहे तशी राजकीय फड रंगात आहे जिल्ह्यातील सर्वांच्या नजरा माढा विधानसभा कडे लागून आ-हेत. येथून भाऊ आणि भावी आमदार होण्यासाठी इच्छुक आहे विकत देवस-ाळे एक इच्छुक नावाने तयार होत आहेत नेत्यांची भेट घेत आपण इच्छुक असल्याचे सोशल मीडियावर प्रसार व प्रचार करीत आहेत . राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार अजित पवार गट यांच्या विरोधात सर्व इच्छुक उमेदवारांनी आपली तयारी सुरू केली आहे असून गावे गावी बैठक घेत मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत.

**मेळाव्यात शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून विद्यमान आमदाराची पुतणे धनराज शिंदे यांनी गावोगावी जाऊन इच्छुक उम ेदवारांनी पायाला भिंगरी लावून फिरत आहे गावोगावी जात कार्यक्रम घेत असताना मतदारांची संवाद साधत आहेत महिलांसाठी त्यांनी होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीची खेळ कार्यक्रम घेत संपूर्ण तालुका पिंजून काढला आहे तर शेतकरी बांधवांसाठी विविध ठिकाणी भव्य शेतकरी मेळावे घेत शेतकऱ्यासोबत संवाद साधत आ-हेत तसेच बेरोजग-ारी युवकांसाठी रोजगार मिळावी मुलाखत पूर्व प्रशिक्षण घेत आहेत.



खेळ पैठणीचा असो किंवा भव्य शेतकरी मेळावा असो अशा बेरोजग-ारी उपासासाठी रोजगार मेळाव्या असो एकंदरीत पाहता अभिजीत पाटील हे म तदारसंघ गाजवत असल्याचे दिसत आहे गावोगावी वाड्या वस्तीवर त्यांची चर्चा होताना दिसून येत आहे. त्यांनी या शेतकरी मेळावा मध्ये सर्वपिक्षा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना दोन रुपये सुद्धा ज्यादा दर देणार असल्याची जाहीर केले.

# कोन्हाळीचे सुपुत्र डॉ. रेवणप्पा अंबारे यांच्या सुपरकॅपॅसिटर वरील संशोधनाचे ऑस्ट्रेलियामध्ये सादरीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोन्हाळी: पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने भारतामध्ये इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत चाल-ली आहे. वाहनांमध्ये बॅटरी सोबत सुपरकॅपॅसिटर जोडल्यास विजेची बचत होऊन बॅटरीचे आयुष्य देखील वाढते. ही संकल्पना पर्यावरण पूरक असून त्यामुळे खर्चामध्ये बचत होणार आहे. भारतामध्ये ऊर्जा साठवणूक ही काळाची गरज ओळखून अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी गावचे सुपुत्र डॉ. रेवणप्पा चंद्रकांत अंबारे हे सुपरकॅपॅसिटर या संकल्पनेवरती संशोधन करीत आहेत.



क्वीनसल्यांड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, ब्रिस्बेन, ऑस्ट्रेलिया येथे २५-२७ सप्टेंबर २०२४ या दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विशेषज्ञ (रिसोर्स पर्सन) म्हणून व्याख्यान देण्यासाठी डॉ. अंबारे यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्रगत साहित्य संश्लेषण वैशिष्ट्यीकरण आणि अनुप्रयोग हा विषय असलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक देशा-तील नामवंत संशोधकांनी सहभाग घेतला होता. ऊर्जा साठवणूक आणि सुपरकपॅसिटर या विषयावरील सखोल संशोधना मुळे प्रा.डॉ. आर. सी. अंबारे यांना हा बहुमान लाभला आहे.

टू व्हीलरमध्येही अल्ट्रा कपॅसिटरचा वापर करणे शक्य असून त्यामुळे बॅटरीचे अल्प आयुष्य, बॅटरी बदलण्यासाठी येणारा खर्च आणि बॅटरीमुळे होणारे प्रदूषण टाळता येणे शक्य आहे. कपॅसिटरला कमी देखभाल लागते. तसेच कितीही थंडी असली तरी वाहन बटन स्टार्ट करता येणे शक्य होते. त्या अनुषंगाने भविष्यातील गरज लक्षात घेऊन भारतात येत्या दहा वर्षांत प्रत्यक्ष सुपर कपॅसिटरचे उत्पादन सुरू होणे आवश्यक असल्याचे मत डॉ. अंबारे यांनी व्यक्त केले.

कोन्हाळी तालुका अक्कलकोट चे श्री. चंद्रकांत रेवणप्पा अंबारे यांचे सुपुत्र डॉ. रेवणप्पा चंद्रकांत अंबारे यांचे शालेय व माध्यमिक शिक्षण आश्रम शाळा कोन्हाळी तसेच पदवी शिक्षण खेडगीज कॉलेज अक्कलकोट येथे झालेले आहे. डॉ. अंबारे यांना, पदव्युत्तर शिक्षण सोलापूर विद्यापीठातून व विद्यावा-चस्पती ( झहऊ) ही पदवी सोलापूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे विद्यमान संचालक तथा विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी. जे. लोखंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली २०१५ मध्ये प्राप्त झालेली असून गेल्या १४ वर्षयापासून ते सुपरकॅपॅसिटर या संकल्पनेवरती संशोधन करत आहेत.

डॉ. अंबारे हे एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून, त्यांना लहान पणापासून संशोधन वृती असल्यामुळे आज जगातील नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांचे पन्नास पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. जगात उर्जा निर्माण व उर्जा साठवणूक या विषयावर संशोधन करणाऱ्या जगभरातील संशोधकाम ध्ये डॉ. अंबारे यांचा उल्लेख गूगल स्कॉलर इंडेक्स मध्ये करण्यात आ-लेला आहे.. डॉ. अंबारे हे सद्या के. एम. सी. कॉलेज, खोपोली येथे सहायक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय परिषदेतील या सहभागासाठी खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. संतोष जंगम, कार्यवाह श्री. किशोर पाटील व सर्व सरकारी आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व तसेच सर्व सहकारी प्राध्यापक यांच्याकडून प्रा. डॉ. आर. सी. अंबारे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींचा ‘पोस्टर मेकिंग’ स्पर्धेत प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोल्यात दि.२७ सप्टेंबर रोजी झालेल्या राज्यस्तरीय ‘पोस्टर मेकिंग’ स्पर्धेम ध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलि.), पंढरपूरच्या विद्यार्थिनींनी प्रथम पारितोषिक मिळवून यश संपादन केले त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



स्वेरीमध्ये नावातच संशोधन असल्यामुळे विद्यार्थी देखील सातत्याने संशोधनात व्यस्त असतात. आता अभियांत्रिकी बरोबरच फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधनाकडे आपले लक्ष केंद्रित करत आहेत हेच या स्पर्धेद्वारे स्पष्ट होते. सांगोला येथील फॅब्रटेक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ‘जागतिक औषधनिर्माणशास्त्र दिवस’ निमित्त आयोजिलेल्या राज्यस्तरीय ‘पोस्टर म ेकिंग’ स्पर्धेत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (पॉलि.) च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी रोहिणी जगन्नाथ शिंदे आणि प्रणिता सुरेश खरात यांनी सादर केलेल्या पोस्टरला प्रथम क्रमांकाचे रोख रु. पाच हजार, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे बक्षीस देऊन म ान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रोहिणी शिंदे आणि प्रणिता खरात यांना स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे आणि प्रा. एस. ए. शेख यांचे मार्गदर्शन लाभले. सदरच्या विद्यार्थिनींनी ‘पोस्टर मेकिंग’ स्पर्धे त ’फार्मसीस्ट मिटिंग ग्लोबल हेल्थ नीडस’ या विषयावर पोस्टर सादर केले होते त्यामुळे त्यांना प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थीनींचे संस्थेचे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दाद-ासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

**सहकार शिरोमणी सहकारी कारखान्याची ३३ वी वार्षिक सौरवतादान सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न**

**कल्याणराव काळे यांचे प्रतिपादन**

# सहकार शिरोमणी कारखाना इतर कारखान्याच्या बरोबरीनेच ऊस दर देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाळवणी दिनांक २८ सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे ऊस दराच्या स्पर्धे त उतरून आतापर्यंत एफ आर पी पेक्षा जादा व इतर कारखान्याच्या बरोबर दिला आहे. येणाऱ्या गळीत हंगामात ही परंपरा कायम ठेवण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असेल त्यासाठी ऊस उत्पादक सभासद बिगर सभासद शेतकरी नेहमी प्रमाणे भक्कम साथ संचालक मंडळात द्यावी असे आव्हान कारखाने जे अध्यक्ष कल्याणराव काळे यांनी कारखाने या वार्षिक योजनेत बोलताना केली.

कारखान्याची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा कारखाना स्थळावर खेळीमेळीच्या वातावरणात व उत्स-ाहात पार पडली यावेळी ते बोलत होते वार्षिक सभेतील सर्व विषयास उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात व एक मताने मंजूर केली यावेळी कारखान्याचे व्हाईट चेअरमन भारत कोळेकर माजी व्हाईस चेअरमन मारुती भोसले राजेंद्र शिंदे व संचालक मंडळाचे प्रमुख उपस्थिती होती.

गळीत हंगाम २०२३ २४ च्या आढावा घेताना कल्याण काळे पुढे म्हणाले की गेल्या वेळेत हंगामात ऍडव्हान्स देऊनही निम्मेपेक्षा जास्त तोंडणे वाहतूक यंत्रणा आले नाही त्यांचा परिणाम सुरुवातीच्या दैनंदिन गव्हावर झाला राज्य शासनाच्या हमेंवर एम एस सी सी बँकेकडून पहिल्या टप्प्यातील कर्ज प्रत्यक्षात हंगाम सुरू झाल्यानंतर कारखान्याच्या खात्यावर जमा न होता संबंधितांच्या बँक खात्यावर जमा झाले जवळपास आठवड्या नीट आठवड्याने कोटी रुपये एमएससी बँकेने कर्जात भरून घेतली गेल्या हंगामात दैनंदिन गाळात क्षमते एवढा ऊस उपलब्ध होण्यासाठी कमी पडणारी ऊस वाहतूक यंत्रणा कमी करण्यासाठी सर्व सहकारी संचालक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतल्यामुळे गेल्या हंगामात २ लाख ३७ हजार आपण करू शकतो .

### असे असेल सन २०२४ २५ च्या गळ्यात हंगामाची नियोजन

**कल्याण काळे म्हणाले की या हंगामा दैनंदिन तीन ते साडेतीन हजार टन ऊस गाळात होण्याच्या दृष्टीने ट्रक ट्रॅक्टर, बँजो बैलगाडी, यांना पहिला हप्ता दिलेला असून दुसऱ्याचे नियोजन सुरू आहे कारखान्यातील देखभाल दुरुस्तीची कामही आता अंतिम टप्प्यात आहेत या हंगामात साडेचार लाख गणिताची उद्दिष्ट व्यवस्थापन करणे ठेवलेले आहे ऊस तोडणी मजूर मुकादम मोहन मालकास संचालक मंडळांनी नेहमीच सहकार्य केले आहे ज्या वाहन मालकाच्या टोळ्या पळून गेल्या आहेत ऍडव्हान्स वसूल करताना बऱ्याच वाहन मालकाची व्याज बसून केलेली नाही आढळून केलेली नाही ग्रामीण भागातील ऊस उत्पादक शेतकरी या उद्योगावर अवलंबून असणार आणि कुटुंबाची आर्थिक सक्षमीकरण या साखर उद्योगावर अवलंबून आहे त्यामुळे उद्योगाला आर्थिक स्थैर्य देण्यासाठी केंद्र शासनाने एफ आर पी च्या तुलनेने साखर आर एस इथेनॉल एम एस पी सी वाढवण्याची गरज वाहून असून त्याची तशी मागणी महाराष्ट्र केंद्र शासनाकडे केली आहे.**

